संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# लोकनियुक्त सरकारची लंगडी बाजू

**प्रमुख** निदर्शक म्हणून लोकसभा निवडणुकीकडे पाहीले जाते. स्वातंत्र्य मिळाल्यापासून म्हणजेच १९५२ पासून आणीबाणीचा अपवाद वगळता या लोकसभा निवडणुका अखंडपणे होत राहिल्या. आतापर्यंत झालेल्या निवडणुकांचा इतिहास पाहिल्यानंतर प्रदीर्घ काळ एकाच पक्षाची राहिलेली सत्ता निवडणूक प्रचारातली परंपरागत पध्दत मतदानाची आणि मतमोजणीची साचेबंद प्रक्रिया असा एक विशिष्ट टप्पा १९९०च्या दशकापर्यंत पाहायला मिळतो. त्यानंतर आलेली ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे, प्रचारामध्ये आलेला आधुनिकपणा निवडणूक मतदार ओळखपत्रे याशिवाय टी एन शेषन हे मुख्य निवडणूक आयुक्तपदी आल्यानंतर राजकीय पक्षांना शिस्त लावण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न आचारसंहितेच्या माध्यमातून लोकशाही मूल्यांचे संवर्धन करण्याची व्यक्त झालेली आवश्यकता बोगस मतदान किंवा मतपेट्या पळवण्याच्या प्रकारांना कसोशिने आळा घालण्यात मिळालेले यश अशा या भारतीय निवडणूक प्रणालीतल्या अनेक जमेच्या बाजू असताना दुसरीकडे याच लोकशाही व्यवस्थेत मते विकत घेण्याचा होणारा प्रयत्न उमेदवारांकडून प्रचंड प्रमाणात खर्च होणारा पैसा आणि अनेक प्रकारचे आधुनिक तंत्रज्ञान येऊनही मतदान टक्केवारीचे ठराविक प्रमाण हे प्रकारही तितक्याच ठळकपणे दिसून येतात. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणत असताना किमान त्या लोकशाहीची निवडणूक ही सर्वात मोठी प्रणाली असताना त्यामध्ये हे असे अनेक दोष किंवा त्रूटी राहाणे तितकेसे योग्य म्हणता येणार नाही. निदान लोकनियुक्त सरकार निवडून देताना एकूण मतदार संख्येच्या ९० टक्के तरी मतदान होणे अत्यंत आवश्यक मानले पाहिजे. परंतु ते उद्दीष्टदेखील साधता आलेले नाही. आज स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या सत्तर वर्षात किंवा लोकशाही प्रक्रियेने सरकार स्थापन करणाऱ्या कार्यपध्दतीला पासष्ट वर्षे होत असताना काही मूलभूत दोष कायम राहाणे हे निश्चितच दुर्दैवी ठरते. हे दोष किंवा या त्रूटी दूर व्हाव्यात आणि ही लोकशाही प्रक्रिया अधिक सशक्त व्हावी यासाठी कोणीही विशेष पुढाकार घेताना दिसत नाही. आपला पक्ष निवडून आणणे निवडणुका आल्या म्हणून मतदान करणे आणि एक सरकारी अनिवार्य काम म्हणून निवडणूक प्रक्रियेचा सोपस्कार पार पाडणे अशा विशिष्ट एका पठडीतला हा व्यवहार परंपरेने चालू असलेला पाहायला मिळतो.

### मतदानाची निराशाजनक टक्केवारी

आज ज्यावेळी निवडणूक आयोगाने भारतातल्या एकूण मतदारांची संख्या सांगितली. तेव्हा मतदार यादीत नाव नोंदवून घेण्याबाबतही बऱ्यापैकी उदासिनता दिसून येते. भारताची आजची एकूण लोकसंख्या अधिकृतपणे सव्वाशे कोटी जरी असली तरी अनधिकृतपणे ती १३० कोटींपर्यंत पोहचते. आणि त्यापैकी नव्वद कोटी मतदार असावेत ही गोष्टही तितकीशी समाधानकारक ठरत नाही. कारण १८ वर्षाखालील नागरिकांची संख्या ही सरासरी २५ टक्के मानली जाते. मग अशा परिस्थितीत ढोबळ मानाने मतदारांची संख्या किमान शंभर कोटी तरी असणे गरजेचे ठरते. म्हणजे आजचा मोबाईल वापरणारा नागरिक सरासरी दोन मोबाईल जरी वापरत असला तरी अशा मोबाईल धारकांची भारतातली संख्या जवळपास १२० कोटींपर्यंत पोहचली आहे. मग १८ वर्षावरील मतदार असा निकष गृहित धरून मतदारांची संख्या नक्कीच शंभर कोटीच्यावर पाहायला हवी. आता या एकूण मतदारांपैकी प्रत्यक्ष होणाऱ्या मतदानाची टक्केवारीसुध्दा खूपच निराशाजनक ठरते. आतापर्यंत झालेल्या लोकसभा निवडणुकांमधील मतदानाची टक्केवारी ही ५५ ते ६० टक्क्याच्या दरम्यानच घुटमळताना दिसते. म्हणजे इथेसुध्दा जवळपास तीस टक्के मतदार हा मतदानाला जात नाही. तेव्हा त्याला मतदान हे तितकेसे महत्त्वाचे वाटत नाही. याचा अर्थ लोकशाहीतल्या या सर्वात मोठ्या उत्सवात सहभागी होणाऱ्यांचा उत्साह किती निराशाजनक आहे हे स्पष्ट होते. जर जगातील एक परिपक्व लोकशाही व्यवस्था म्हणून तिची प्रतिष्ठा निर्माण करायची असेल तर मतदानाची टक्केवारी ८० ते ९०टक्क्यांपर्यंत असलीच पाहिजे. तरच निवडून येणारे सरकार हे खऱ्या अर्थाने लोकनियुक्त सरकार आहे असे म्हणता येईल. केवळ लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी आणि मग त्यांनी बनवलेले सरकार म्हणजे लोकनियुक्त सरकार इतकी त्याची तोकडी व्याख्या करून चालणार नाही. लोकसंख्येपैकी किंवा मतदार संख्येपैकी ८० ते ९० टक्के लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी हेच खऱ्या अर्थाने लोकनियुक्त सरकार स्थापन करण्याच्या पात्रतेचे ठरू शकतात.

### राजकीय पक्षांविषयी अविश्वास

लोकशाही व्यवस्थेची ही मोठी लंगडी बाजू आहे असे म्हणावे लागेल. खरे तर सत्तर वर्षामध्ये मतदानाची टक्केवारी सत्तर टक्क्यांच्यावर तरी पोहचायला हवी होती. आणि सध्याची समाजातली एकूण साक्षरता राजकारण , समाजकारण किंवा अर्थकारणाविषयीची जागरुकता या सर्वांची गोळाबेरीज केली तर त्याचे प्रतिबिंब प्रत्यक्ष मतदानाच्या टक्केवारीतून उमटायला हवे होते. दुर्दैवाने आतापर्यंतच्या अनुभवाप्रमाणे सुशिक्षित वर्गच मतदान करण्याची टाळाटाळ करतो. राजकारण्यांविषयी त्याच्या मनामध्ये राग आणि तिटकारा असतो ही वस्तुस्थिती आहे. परंतु मतदानापासून उदासिन राहाणे हा काही त्यावरचा उपाय ठरू शकत नाही. आपल्याला जर कोणताच उमेदवार पसंत नसेल तर मतदान यंत्रांवर नोटा नावाच्या बटणाची सोय केलेली असते. म्हणजेच वरीलपैकी कोणताच उमेदवार पसंत नाही हे ते बटण दाबून सुचवता येऊ शकते. असा सर्व लोकशाहीशी निगडीत सुधारणा होत असताना मतदानाच्या टक्केवारीत सुधारणा होऊ नये. हे आणखीनच विपरित ठरते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे प्रामुख्याने राजकीय पक्षांकडून या लोकशाही प्रक्रियेचा योग्य तो सन्मान होत नाही. केवळ सत्ता प्राप्त करण्याकरीता ते एक साधन मानले जाते आणि मग सर्वप्रकारच्या तडजोडी करून मते मिळवण्याची कारस्थाने होत राहातात. खरे तर राजकीय पक्षांनी स्वतःच्या निवडणूक व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणली पाहिजे. आणि खर्चावर नियंत्रण आणून मतदाराच्या मनात विश्वास निर्माण केला पाहिजे. त्यातून मतदानाची टक्केवारी वाढायला मदत होऊ शकेल.